पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

जनसंपर्क अधिकारी
दि.२९/०४/२०२६.

प्रति,

मा.संपादक,
दैनिक वृत्तपत्र -------------

## गॅस एजन्सीचे गोडावुन फोडुन गॅस सिलेंडरची चोरी करणारे अट्टल गुन्हेगारांची टोळी स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांचेकडुन जेरबंद...

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | रिपोर्ट देणारे |
|---|---|---|
| फैजपुर पो.स्टे. | 78/2026, भा.न्या.सं.2023 चे क. 305(a) , 331(3),331(4) प्रमाणे. | पो.उप.निरी.सोपान गोरे , स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव. |
| वरणगाव पो. स्टे. | 48/2026, भा.न्या.सं.2023 चे क. 305(a),334(1) प्रमाणे. | --- |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | **गुन्हा उघड तारीख** |
| गोपनीय व तांत्रीक | 01.दि.25.04.2026 रोजी 12.27 वा.<br>02.दि.26.02.2026 रोजी 17.12 वा. | दि.29/04/2026 |

गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार.

**मा.श्री श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव.**
**मा.श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक,जळगांव परिमंडळ.**
**मा.श्री. अनिल बडगुजर, उपविभागीय पोलीस अधिकारी,फैजपुर उपविभाग, जळगांव.**
**मा. श्री. केदार बारबोले, उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ भाग, प्रभार मुक्ताईनगर भाग.**
यांचे मार्गदर्शनाखाली
**श्री.राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक सोपान गोरे, पो.हे.कॉ.प्रितम पाटील,प्रेमचंद सपकाळे,सलीम तडवी,उमाकांत पाटील,यशंवत टहाकळे, पो.ना श्रीकृष्ण देशमुख आणि पो.अं.बबन पाटील, सचिन घुगे, प्रदीप सपकाळे, मयुर निकम तांत्रीक मदत पो.अं गौरव पाटील, मिलींद जाधव.**

| | |
|---|---|
| **आरोपीचे नांव व पत्ता :-** | १) शेख बिलाल शेख नबी,वय-३२,रा.कासोदा ता.एरंडोल,जि.जळगाव<br>२) वसीम खान शाबीर खान,वय - ३१,रा.तांबापुरा ता.जि.जळगाव<br>३) चेतन सुरेश काळे,वय-३८,रा.नशिराबाद.ता.भुसावळ.जि.जळगाव |
| **उघड गुन्हे :-** | 1)फैजपुर पो.स्टे. 78/2026, भा.न्या.सं.2023 चे क. 305(a) , 331(3),331(4) प्रमाणे.,<br>2)वरणगाव पो.स्टे. 48/2026, भा.न्या.सं.2023 चे क. 305(a),334(1) प्रमाणे. |
| **जप्त मुद्देमाल :-** | 1) 1,55,000/- रु कि.चे भारत गॅस कंपनीचे भरलेले 62 नग गॅस सिलेंडर प्रत्येकी 2500/- रु प्रमाणे<br>2) 1,42,500/- रु किं. चे भारत गॅस कंपनीचे खाली असलेले 95 नग गॅस सिलेंडर प्रत्येकी 1500/- रु प्रमाणे<br>3) 1,30,000/- रु किं. ची एक सुझुकी कंपनीची बर्कमन मॉडेलची मोपेड गाडी क्र. MH 19 EU 8871<br>------------------------------<br>एकुण 4,27,500/- |

### -: गुन्हयाची थोडक्यात हकिगत :-

दि.२५/०४/२०२६ रोजी फैजपुर पोलीस स्टेशन येथे फिर्यादी नामे ललीत रघुनाथ राणे वय ५८ वर्ष व्यवसाय संचालक श्रीधर गॅस एजन्सी फैजपुर रा. श्रीराम कॉलनी, रिंगरोड फैजपुर ता. यावल यांनी फिर्याद दिली की, कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी त्यांचे गॅस सिलेंडर गोडावुनचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन ३,११,८००/- रुपये किम्मतीचे भारत गॅस कंपनीचे प्रत्येकी १४.२ कि.ग्रॅ. वजनाचे गॅस भरलेले १०० सिलेंडर चोरुन नेले बाबत फिर्याद दिल्याने फैजपुर पोलीस स्टेशन येथे सीसीटीएनएस गुरनं. ७८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तसेच दि. २६/०२/२०२६ रोजी वरणगाव पोलीस स्टेशन येथे फिर्यादी नामे नरेंद्र उत्तमराव अहिरे वय ५१ वर्ष धंदा- भारत गॅस संचालक विभाग, वरणगांव शहर, रा. शांतीनगर, भुसावळ जि. जळगांव यांनी फिर्याद दिली की, कोणीतरी , कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी त्यांचे गॅस सिलेंडर गोडावुन मधुन ७२,८४६/- रुपये किमतीचे भारत गॅस कंपनीचे प्रत्येकी १४.२ कि.ग्रॅ. वजनाचे गॅस भरलेले ५७ सिलेंडर चोरुन नेले बाबत फिर्याद दिल्याने वरणगांव पोलीस स्टेशन येथे सीसीटीएनएस गुरनं. ४८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ),३३१(४) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

### -: पोलीस कारवाई आणि तपास:-

सदर दोन्ही गुन्हयांचे गांभिर्य लक्षात घेता सदर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मा.श्री. श्रीकांत धिवरे,पोलीस अधीक्षक, जळगांव यांनी श्री राहुल गायकवाड, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांना आदेशीत केले होते. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव येथील २ वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली होती. सदरची तपास पथके ही नमुद दोन्ही गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना गोपनिय माहितीच्या आधारे तसेच फैजपुर पो.स्टे. येथे दाखल असलेल्या गुन्हयाचे घटनास्थळावरील बारकाईच्या निरीक्षण करुन काही संशयास्पद वाहनांचा मागोवा घेवुन त्यांची माहिती प्राप्त करुन सदर गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयात संशयीत आरोपी नामे १) शेख बिलाल शेख नबी,वय-३२,रा.कासोदा ता.एरंडोल,जि.जळगाव २) वसीम खान शाबीर खान,वय - ३१,रा.तांबापुरा ता.जि.जळगाव ३) चेतन सुरेश काळे,वय-३८,रा.नशिराबाद.ता.भुसावळ.जि.जळगाव यांना ताब्यात घेवुन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी सदरचे दोन्ही गुन्हे हे त्यांचे इतर साथीदार यांचे सोबत केल्याची कबुली दिली आहे. त्यांचेकडुन गुन्हयात चोरीस गेलेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**नमुद आरोपीतांना फैजपुर पोलीस स्टेशन यांचे ताब्यात दिले असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक, श्री मैनुद्दीन सैय्यद व विनोद गाभणे हे करीत आहेत.**

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव.

